महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाच्या नुतनीकरणाबाबत

(१) ८०३ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील तुषार व सारंग ही शासकीय विश्रामगृहे कार्यरत आहेत तसेच नागडोंगरी, चेंढरे येथे कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध असून ती धोकादायक परिस्थितीत असल्याने नव्याने बांधकाम करण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन आर्थिक वर्षापासून पर्यटकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याने तसेच शासकीय अधिकारीही मोठ्या प्रमाणात येत असल्याने उपलब्ध जागा अपूरी असल्याने नवीन शासकीय विश्रामगृह बांधणेबाबत मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अलिबाग तालुक्यातील शासकीय विश्रामगृहांच्या प्रस्तावित इमारतीचे नुतनीकरण व नव्याने बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) तुषार विश्रामगृह विशेष दुरुस्ती कामास मान्यता दिली असून काम प्रगतीपथावर आहे.

नविन विश्रामगृह बांधकाम करण्यासाठी शासकीय भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांची व निवासस्थानांची बांधकामे पूर्ण करण्याबाबत

(२) २५६५ (२२-१२-२०१४). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा निर्माण होऊन १५ वर्षे पूर्ण झाली असूनही शासनाच्या विविध विभागांनी आपली कार्यालय बांधकामे व निवासस्थाने बांधकामे पूर्ण करण्यासाठी शासनाकडे मंजूरी व निधी उपलब्धतेसाठी प्रस्ताव सादर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्ह्यातील नवीन शासकीय प्रशासकीय व निवासी इमारत वाशिम येथे बांधण्याची आवश्यकता असताना सुध्दा अद्यापपर्यंत विविध प्रकारंची १४७ निवासस्थाने बांधण्याचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नवीन निवासस्थाने व प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनस्तरावर मंजूरीसाठी सदर प्रकरणे प्रलंबित असण्याची कारणे काय व सदरहू प्रलंबित प्रस्तावाच्या मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व या प्रस्तावांना केव्हापर्यंत मंजूरी मिळणे अपेक्षित आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

तथापि, दि. ०२/०३/२०१५ अन्वये मा.आमदार महोदयांच्या दि. १२/११/२०१४ चे पत्रातील मागणीच्या अनुषंगाने १४७ निवासस्थाने बांधकामाचा प्रस्ताव तयार करण्याकरीता कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, वाशिम यांनी त्यांचे पत्र क्र. २०२०/तां.३/दि.१६/०३/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, वाशिम यांना सदर निवासस्थाने बांधकामाकरीता आवश्यक असणारी ३ एकर जमिन उपलब्ध करुन देणेसाठी विनंती केली आहे.

(३) उपलब्ध निधी व निकषांचे अधिन राहून प्राधान्य क्रमानुसार काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील रिसोड व मालेगाव येथील तहसील कार्यालयाचे नविन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी निधी उपलब्धतेबाबत

(३) ४२७४ (२२-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील रिसोड व मालेगाव येथे तहसील कार्यालयाच्या नविन प्रशासकीय इमारत बांधकामासाठी शासनाने २०१३ मध्ये मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकिय इमारत बांधकामासाठी अद्यापही निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन प्रशासकीय इमारतीसाठी अद्यापही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे खरे नाही.

रिसोड व मालेगाव तहसील कार्यालयासाठी आतापर्यंत प्रत्येकी रु.४५.०० लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून रिसोड येथील कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच मालेगाव येथील काम निविदास्तरावर आहे.

प्रश्नाधीन कामास पुढील आर्थिक वर्षात निकष व प्राथम्यक्रमानुसार निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

गोदिंया सांगडी-नवेगांव गोवणगाव-केशोरी या रस्त्याची सुधारणा करण्याबाबत

(४) ७४३७ (१०-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग (रो.ह.यो.) गोदिंया सांगडी-नवेगांव गोवणगाव-केशोरी मार्ग मु.जा.मा. ३५ च्या १२/०० ते २४/०० ची सुधारणा करण्याचे काम माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये रु. ३.१४ कोटीना दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाची अनुमती प्राप्त न झाल्यामुळे काम थांबवावे लागले असून सदर कामावर रु. ४४.६५ लक्ष खर्च झाल्यानंतर हे काम थांबविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व तदनुसार दोषी/जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :(१) होय.
(२) सदर कामास माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये सुरुवात करुन माहे मे, २०१२ पर्यंत सदर रस्त्यावरील ४६ मोऱ्याच्या रुंदीकरणाचे काम व कि.मी. १२/२०० ते १३/६०० पर्यंत रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उक्त कामावर रु.३८.६७ लक्ष खर्च झाला. पुढील लांबीत रस्त्याच्या दोन्ही बाजूस अभयारण्य असल्याने वन खात्याद्वारे रुंदीकरणाचे कामास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे पुढील रस्ता लांबीतील काम थांबविण्यात आले आहे.

(३) सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस अभयारण्य असल्याने वन खात्याकडून मंजूरी मिळण्याकरिता सा.बा. विभागाद्वारे वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला असून उपवन संरक्षक, गोंदिया विभाग, गोंदिया यांचे पत्र क्र.३९५९, दि.२२/९/२०१४ अन्वये अटी व शर्तीचे अधीन राहून काम करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यावर चौकशी वा कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) वन खात्याद्वारे विलंबाने परवानगी प्राप्त झाल्यामुळे काम पूर्ण करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) शासकीय कार्यालये
भाड्याच्या जागेत भरत असल्याबाबत

(५) ८०४३ (०९-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) शासकीय कार्यालये भाड्याच्या जागेत भरत असून त्यांची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर तालुक्यातील शासकीय इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन इमारती उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार भाड्याच्या जागेत असलेल्या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत व तसेच सरकारी जागेत इमारती उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

कर्जत तालुक्यातील सध्या १७ शासकीय कार्यालये भाड्याच्या जागेत असल्यामुळे त्यांची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारीत येत नाही.

(२) सदर प्रस्तावित इमारतीकरीता आवश्यक असणारी जागा प्राप्त करणेबाबत प्रयत्न आहे.

(३), (४) व (५) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि.बुलडाणा) येथील प्रशासकीय इमारतीचे काम प्रलंबित असल्याबाबत

(६) ८४८६ (०९-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील प्रशासकीय इमारतीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत बांधकामाला वितरीत केलेल्या निधीपैकी किती काम पुर्ण झाले आहे,

(३) तसेच सदर इमारतीचे काम पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी शासन तात्काळ उपलब्ध करुन देणार आहे काय,

(४) सदर प्रशासकीय इमारतीच्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय.

सद्य:स्थितीत इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) या इमारतीसाठी सन २०१२-१३ ते २०१४-१५ या तीन वर्षात रक्कम रु.३८४.२८ लक्ष निधी प्राप्त झाला. या निधीमध्ये मुख्य इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

(३) निधी उपलब्धतेनुसार सदरचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मनसर-बोरखेडी मार्गावरील चौपदरी रस्त्याच्या कामातील गैरव्यवहाराबाबत तसेच अवैध टोल नाका हटविण्याबाबत

(७) ८७२४ (१०-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जाम मार्गावरील बोरखेडी व नागपूर जबलपूर मार्गावरील मनसर या चौपदरी रस्त्याच्या बांधकामात गैरव्यवहार झाला असून अवैध टोलवसूली सुरु असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून उक्त टोल नाका तातडीने बंद करावा तसेच या टोलनाक्याच्या माध्यमातून शासनाची फसवणूक व जनतेची लूट करण्याऱ्या टोल ठेकेदारांची तसेच त्याला साथ देणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडे आंदोलन करुन केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओरीएंटल बायपास कंपनीकडे या टोल नाक्याचे काम असून कंपनीने ९५ किमी रस्ता केला व त्यांचे ६० टक्के काम पूर्ण केल्यानंतरच टोल वसुली सुरु केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाची किंमत ११७०.५२ कोटी रुपये असून टोल ठेकेदारांनी १२८८.६८ कोटी रुपयांच्या कर्जाची मागणी केली असता बँकेने त्यांना १०५२ कोटींचे कर्ज मंजूर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्यक्षात रस्त्याचे काम ७३४.५२ कोटी रुपयांमध्ये झाले असता ठेकेदाराने शासनाकडून ३४१ कोटीचे अनुदान मिळविले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर कंपनीने रस्त्याचे ७५ टक्के काम पुर्ण केले नसंतानाही अवैध टोल वसुली सुरु केल्याप्रकरणी कंपनीविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१), (२), (३) व (४) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून मध्यप्रदेश/महाराष्ट्र राज्य हद्द ते नागपूर या राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ चे चौपदरीकरण आणि कामटी-कन्हान व नागपूर बाह्यवळण रस्ता अशा ५६.६१३ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम संकलन-बांधकाम-अर्थसहाय-वापर व हस्तांतर (DBFOT) यातत्यावर मे. ओरिएंटल नागपूर बायपास कन्स्ट्रक्शन कं.लि.या कंपनीमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. त्यामध्ये अस्तित्वातील नागपूर-हैद्राबाद या २२.०१५ कि.मी. अस्तित्वातील चौपदरी महामार्गाच्या देखभाल व दुरुस्तीचा सुध्दा समावेश असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे. प्राधिकरणाने केलेल्या अंदाजानुसार या प्रकल्पाची किंमत रु. ११७०.५२ कोटी रुपये असून करारनाम्यानुसार किंमत रु. १९७१.३२ कोटी इतकी आहे. तसेच प्रकल्पासाठी केंद्रशासनाकडून रु. ४५५.२१ कोटी एकूण अनुदान मंजूर केले असून त्यापैकी रु. ४००.७१ कोटी अनुदान सवलतकरास वितरीत केले आहे. सवलतकराने एकूण ७८.६२५ कि.मी. मंजूर लांबीपैकी वनक्षेत्रातून जाणा-या ३७.४५ कि.मी. लांबीतील काम वगळून उर्वरित ४१.१७५ कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण केल्यानंतर करारनाम्यातील तरतूदीनुसार (केलेल्या वावानुसार) दि.१०.११.२०१२ पासून पथकरवसूली सुरु केली असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.

(५) करारनाम्यातील तरतूदीनुसार पथकर वसूली सुरु असल्याने कंपनीविरुध्द कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

जालना-बीड राज्य महामार्ग येथे अंबड शहराच्या बाहेरुन बायपास रस्ता करण्याबाबत

(८) ११५५५ (१०-०४-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना-बीड राज्य महामार्ग अंबड शहरातून जात असल्याने रहदारीस अडथळा होत असल्याने अंबड शहराच्या बाहेरुन बायपास रस्ता करण्याच्या मागणीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अंबड शहराच्या बाहेरुन बायपास रस्ता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आकोट येथील (जि.अकोला) दुय्यम निबंधक कार्यालयाचे
बांधकाम मंदगतीने होत असल्याबाबत

(९) १२७९८ (१०-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचे बांधकाम गेल्या अकरा महिन्यापासून मंदगतीने सुरु असल्याने अद्यापही काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर कार्यालयाचे बांधकाम मंदगतीने करणाऱ्या दोषी कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) अंशतः खरे आहे.

(२) सदर कामाकरिता डिसेंबर, २०१४ च्या पुरवणी अर्थसंकल्पात रु.२५.५८ लक्षची तरतूद करण्यात आली. तथापि, सदर निधी प्रत्यक्षात मार्च, २०१५ मध्ये प्राप्त झाला. निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अकोला यांच्या शिफारशींनुसार, अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, अकोला कार्यालयाचे दि.२८.५.२०१५ च्या पत्रान्वये संबंधित कंत्राटदारास या कामाची भाववाढ गोठवून दिनांक १.३.२०१५ पासून रु.५००/- प्रतिदिन प्रमाणे दंड आकारणी मंजूर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राहाता (जि.अहमदनगर) येथे प्रशासकीय इमारत बांधण्याची मागणी

(१०) १६२८८ (०६-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहाता (जि.अहमदनगर) येथे प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव दि.१५/१०/२०१३ रोजी मा.महसूल मंत्री यांचेकडे सादर केला असता निधी अभावी स्वीकारण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय, असल्यास, किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) तसेच प्रशासकीय इमारत नसल्यामुळे गाव व खेड्यापाड्यातून येणा-या लोकांना वेगवेगळ्या कार्यालयात जावे लागत असल्यामुळे पैसा व वेळ खर्च होत असल्याने मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासकीय इमारतीसाठी निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) राहाता (जि.अहमदनगर) येथे नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव दि.०६.०१.२०१४ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सध्या राहाता येथे प्रशासकीय इमारत उपलब्ध आहे. परंतु सदरची जागा अपुरी पडत असल्याने नविन प्रशासकीय इमारत बांधण्याचे नियोजित आहे.

(४) उपलब्ध निधी व निकषांचे अधीन राहून प्रस्तावास मान्यता देण्याचे नियोजित आहे.

मेळघाट (ता.जि.अमरावती) येथील अतिदुर्गम भागाचा संपर्क थेट मुख्यालयापर्यंत व्हावा याकरीता रस्ते बनविण्याचे काम सुरु करण्याबाबत

(११) १७०२० (३०-०७-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (ता.जि.अमरावती) येथील अतिदुर्गम भागाचा संपर्क थेट मुख्यालयापर्यंत व्हावा याकरीता रस्ते बनविण्याचे काम काही वर्षापूर्वी सुरु करण्यात आले होते परंतु तदनंतर या कामाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने या काळात जुन्याच मार्गावर नवीन रस्ते तयार करण्याचे प्रकार सुरु असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील परिसरातील टेमकी, हरदोली आणि सालई मार्गावर अल्पावधीत दुस-यांदा डांबरीकरणाचे काम झाले असून या प्रकरणी शासन चौकशी करुन दोषापितांवर कारवाई करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव-बोरगांव-आमखेडा-जोडगव्हाण प्रजिमाची सुधारणा करण्याबाबत

(१२) १७२६७ (३१-०७-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगांव-बोरगांव-आमखेडा-जोडगव्हाण या प्रमुख जिल्हा मार्गाचे कि.मी. ८/०० ते ११/०० ची सुधारणा करण्याच्या कामास २०११-१२ च्या गट ब कार्यक्रमात मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच प्रजिमा रस्त्यावरील कि.मी. १०/७०० ते १४/०० ची सुधारणा करणे कामास नाबार्ड अंतर्गत व कि.मी. ८/०० ते १०/७०० ची सुधारणा करण्याच्या कामास २०१३ च्या पत्रकात मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गट ब, नाबार्ड व अंदाजपत्रकिय कामे कधी पूर्ण झाली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६) : (१) नाही.
(२) होय.
(३) नाबार्ड १८ अंतर्गत मंजूर असलेले रस्त्याचे कि.मी. १०/७०० ते कि.मी. १४/०० लांबीतील बी.बी.एम. कारपेट व स्लॅब कल्व्हर्टचे काम पूर्ण असून किरकोळ कामे प्रगती पथावर आहेत.

कि.मी.०/० ते ०/५००, कि.मी. ३/०० ते कि.मी. ३/५०० व कि.मी. ८/०० ते कि.मी. १०/७०० मधील रस्त्याच्या सुधारणेची कामे मार्च, २०१५ अखेर पूर्ण झालेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील गारगाई नदीवरील पुलाच्या उभारणीबाबत

(१३) १७९३९ (०३-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :

सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील गारगाई नदीवरील पुलाची उभारणी करण्याच्या मागणीसाठी गारगाई पुलाजवळ परिसरातील ग्रामस्थांनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी आमरण उपोषण करुन आंदोलन केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुलाच्या उभारणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच या परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६) : (१) होय.

(२) गारगाई नदीवरील नवीन पुलाच्या कामास रु. ३६२.१२ लक्ष रकमेस मंजूरी मिळाली असून निविदा प्राप्त झाल्या असून निविदा स्विकृतीची कार्यवाही सुरु आहे. लवकरच काम हाती घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदरच्या कामाबाबत सतत पाठपुरावा करुन कामाच्या बांधकामास मंजूरी प्राप्त करुन घेतली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पोलादपूर-महाबळेश्वर (जि.सातारा) मार्गावरील आंबेनळी घाटातील संरक्षण कठड्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(१४) १९५३१ (३१-०७-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर-महाबळेश्वर (जि.सातारा) मार्गावरील आंबेनळी घाटातील संरक्षण कठड्यांची पडझड झाली असल्याचे नुकतेच दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरील आंबेनळी घाट मार्गावर पोलादपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जॅकवेलवळील दोन ठिकाणी संरक्षण कठड्यांची पडझड झाली असल्यामुळे येथील प्रवास धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याची आणि धोकादायक ठिकाणी माहितीफलक लावण्याची मागणी सातत्याने प्रवाश्यांकडून वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१६) : (१) अंशतः खरे आहे.
(२) पोलादपूर शहराला पाणीपुरवठा करणा-या जॅकवेल जवळील संरक्षण भिंत ढासळल्याने साईडपट्टीचे नुकसान झाले होते. तथापि सदर ठिकाणी अपघात टाळण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील संरक्षक दगडी भिंत बांधलेली आहे.
(३), (४) व (५) प्रश्नाधीन घाटरस्त्यावर पावसाळ्यातील अतीवृष्टीमुळे कठडयाची पडझड होत असते. सदर मार्गाची वेळोवेळी पाहणी करुन दुरुस्त्या करण्यात येतात. सद्यःस्थितीत घाटरस्त्यावर धोकादायक ठिकाणी माहितीफलक लावण्यात आलेले असून पोलादपूर शहरास पाणीपुरवठा करणा-या जॅकवेलजवळ कायम स्वरुपी संरक्षक भिंत बांधण्याचे काम प्रगतीत असून मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मंगरुळपीर (जि.वाशिम) येथील तुळजापूर येथे सामाजिक न्याय विभागाचे निवासी आश्रमशाळा व वसतीगृहाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

(१५) २३६३९ (२१-०८-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरुळपीर (जि.वाशिम) येथील तुळजापूर येथे सामाजिक न्याय विभागाचे निवासी आश्रमशाळा व वसतीगृहाचे बांधकाम निकृष्ट झाले असल्याचे मा. मंत्री यांनी दिनांक २५ मार्च, २०१३ चे लेखी उत्तरात दिले असून दिनांक २२ मे, २०१३ च्या कपात सुचनेला उत्तर देतांना संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासीत केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोषी पाच अधिकारी यांचेवर झालेल्या बांधकामातील गैरव्यवहाराबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१६) : (१) होय.
(२) संबंधित अधिका-यांवर दोषारोष निश्चित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अबिटघर साठेपाडा (ता.वाडा, जि.पालघर) येथील रस्त्याचे खडीकरण व मजबूतीकरणाबाबत

(१६) २३९९९ (३०-०७-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अबिटघर साठेपाडा (ता.वाडा, जि.पालघर) येथील रस्त्याचे खडीकरण व मजबूतीकरण काम न करता रु.८.०० लक्ष सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी माहे मार्च, २०१४ मध्ये रस्ता न बनविता ठेकेदारास रक्कम देण्यात आली असे दिनांक ५ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१६) : (१) नाही.

(२) आबिटघर-साठेपाडा ग्रा.मा. ३५६ वरील ३७५ मीटर लांबीचे खडीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम चेअरमन शादावल मजूर कामगार सोसायटी, पालघर यांना सन २०१३-१४ मध्ये देण्यात आले होते. सदर काम सन २०१३-१४ मध्ये पूर्ण झाले असून कामाचे अंतिम देय रु. ८,००,०००/- अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्हातील सातारा - लोणंद - बारामती तसेच सातारा-कोरेगाव माण-पंढरपूर या रस्त्यांचा समावेश राष्ट्रीय महामार्गात करण्याबाबत

(१७) २४७७८ (३०-०७-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे १ लाख कोटी रुपये खर्च करुन देशातील सर्व राज्यातील रस्त्यांची कामे करण्याचा केंद्र शासनाने नुकताच निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील या योजनेअंतर्गत किती रस्त्यांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत, यात सातारा जिल्ह्यातील सातारा - लोणंद - बारामती रस्ता तसेच सातारा-कोरेगाव माण-पंढरपूर रस्ता याचा समावेश राष्ट्रीय महामार्गात करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१) राज्य शासनाकडे याबाबत माहिती उपलब्ध झालेली नाही.

(२) व (३) राज्यातील रस्ते राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यासाठीचे एकूण २२ प्रस्ताव केंद्रशासनास सादर करण्यात आले आहेत, या सादर प्रस्तावामध्ये सातारा जिल्ह्यातील सातारा-लोणंद-बारामती आणि माण ते पंढरपूर मार्गाचा समावेश नाही. तथापि, केंद्रशासनाच्या दिनांक २१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तत्वतः राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झालेल्या सातारा-लातूर या ३३८ कि.मी. राष्ट्रीय महामार्गामध्ये सातारा जिल्ह्यातील सातारा-कोरेगाव-म्हसवड (माण) हा रस्ता समाविष्ट आहे.

सदर रस्त्याच्या विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची कार्यवाही, केंद्रशासनाच्या दिनांक २१.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महादुला-पंचाळा (ता.रामटेक, जि.नागपूर) मार्गावरील पूलावर पायल्या टाकण्याच्या प्रस्तावाबाबत

(१८) २५८१३ (१७-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महादुला-पंचाळा (ता.रामटेक, जि.नागपूर) मार्गावरील पूलावर पायल्या टाकण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पूलावर पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने तेथे पायल्या टाकण्याची नितांत गरज असून तशी मागणी तेथील ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केल आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीनुसार तसेच या पूलावरील पाण्याचा प्रचंड प्रवाह लक्षात घेता पायल्या बांधण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात यते आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्नाधीन काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

आदिवासी विद्यार्थ्यांना वाटण्यात आलेल्या कोटयवधी रुपयांच्या शिष्यवृत्तीतील गैरव्यवहाराबाबत चौकशी समिती नेमण्याबाबत

(१९) २८२१२ (३१-१०-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना वाटण्यात आलेल्या कोटयवधी रुपयांच्या शिष्यवृत्तीतील घोटाळयाची चौकशी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी (एसआयटी) चौकशी समिती नेमण्याचे आदेश दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस विद्यार्थ्यांच्या नावे कोटयवधी रुपयांच्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना भोजनासाठी त्यांच्या खात्यात रोख रक्कम जमा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०२-२०१६) : (१) राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती वाटपातील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी विशेष चौकशी पथक स्थापन करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.२३.०२.२०१५ रोजीच्या विभागाच्या आढावा बैठकीत दिले आहेत.

(२) गडचिरोली प्रकल्पांतर्गत महाविद्यालयांमधील शिष्यवृत्ती योजनांच्या गैरव्यवहाराबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत एकूण ९ महाविद्यालयांचा रु.२,६०,९०,१८६/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार उघडकीस आलेला आहे.

(३) व (४) आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजनासाठी त्यांच्या खात्यात रोख रक्कम जमा करण्याबाबतचा प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधिन नाही.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशास अनुसरून शिष्यवृत्ती वाटपातील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी गृह विभागाच्या दि.१५.१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विषेश चौकशी पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील वेरवली कोंड (ता.लांजा) येथे लाखो रुपयांचा डांबर साठा सापडल्याबाबत

(२०) २८३५९ (२३-१२-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील वेरवली कोंड (ता.लांजा) येथे सार्वजनिक बांधकाम विभागाची लाखो रुपये किमतीची डांबर साठा केलेली ४२ पिंपे खासगी जागेत सापडल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डांबराची पिंपे कित्येक महिने पडून राहिल्यामुळे कालबाह्य झाली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मुख्य कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी लांजा पोलीस स्थानकात चौकशी अर्ज दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय आणि तद्नंतर तपास होऊन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) या प्रकरणी खातरजमा करण्याकरीता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी लांजा पोलिसांकडे चौकशी अर्ज दाखल केला आहे हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी पोलीसांनी केलेल्या चौकशी दरम्यान सदरहू पिंपे संबंधीत शाखा अभियंता यांनी रस्त्याच्या बाजूस खाजगी जागेत मालकाच्या सहमतीने सुरक्षिततेसाठी तात्पुरत्या स्वरुपात ठेवली असल्याचे निष्पन्न झालेले असून या प्रकरणी कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी येथील उपविभागीय कार्यालय इमारतीचा ताबा सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्याकडून जिल्हापरिषद कोल्हापूर यांच्याकडे वर्ग करण्याबाबत

(२१) २८५१८ (२३-१२-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी येथील सध्याची उपविभागीय कार्यालयाची इमारत (हवामहल बंगला)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्या ताब्यातून जिल्हापरिषद कोल्हापूर यांच्याकडे वर्ग करण्याची मागणी गेल्या १५ वर्षांपासुन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९९२ पासून या जागेत इचलकरंजी उपविभागीय कार्यालय सुरु असून जागेच्या मालकीवर जिल्हा परिषदेकडून हक्क सांगितला जात असून इचलकरंजी शहरात जिल्हापरिषदेचे कोणतेही कार्यालय नसल्यामुळे व ही जागा मध्यवर्ती बसस्थानकापासुन जवळ असल्यामुळे तेथे उपविभागीय कार्यालय सुरु राहणे सोईस्कर ठरणार असल्याने याबाबत तातडीने निर्णय घेण्याची विनंती प्रस्तुत लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री व ग्रामविकास मंत्री यांच्याकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.

सदर इमारत ही जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडून दि. २२.१.१९९२ पासून तहसिलदार तालुका हातकाणंगले यांच्या ताब्यात देण्यात आली असल्याचे जिल्हा परिषद उपविभाग हातकणंगले यांनी कळविले आहे.

(२) असे निवेदन या विभागामध्ये प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील कोल्हापुर जिल्ह्यातील किणी टोल नाका बंद करण्याची मागणी

(२२) २८५२३ (२३-१२-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील कोल्हापुर जिल्ह्यातील किणी टोल नाका बंद करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून विविध स्थानिक संघटनांनी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे केली आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, राज्य शासनाने दि.१ जून,२०१५ पासून १२ टोल नाके बंद करण्याच्या व ५३ टोल नाके अंशत: बंद करण्याच्या निर्णयामध्ये किणी टोलनाक्याचा समावेश नाही, हे सुध्दा खरे आहे काय?

(३) असल्यास, सदर टोल नाका बंद करण्याबाबत शासनाची भूमिका काय?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) :(१) अशा आशयाचे कोणतेही निवेदन प्राप्त न झाल्याचे पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ च्या सातारा - कागल ह्या कि.मी. ५९२/२४० ते किमी. ७२५/०० भागातील चौपदरीकरण महामार्गाचे सवलतकर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कळविले आहे.

(२) होय.

(३) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना दिनांक ०५ मे, २००५ नुसार किणी व तासवडे ह्या ठिकाणी पथकर आकारणी चालू असल्याचे सातारा ते कागल ह्या चौपदरीकरण महामार्गाचे सवलतकर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडह यांनी कळविले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात रेल्वे ओव्हर ब्रीज बांधणेबाबत

(२३) २८५३० (२३-१२-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-मिरज रेल्वे मार्गावर अतिग्रे-इचलकरंजी प्रजिमा २५ वर अतिग्रे-इचलकरंजी प्रजिमा 25 वर अतिग्रे गावाजवळ आणि हातकणंगले-इचलकरंजी रस्ता रा.मा.१२६ वर हातकणंगले गावाजवळ १ लक्ष/३ टीव्हीयु पेक्षा जास्त वाहतूक असल्याने कॉस्ट शेअरिंग बेसिसवर रेल्वे ओव्हर ब्रीज बांधणेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, कोल्हापूर यांनी मुख्य पूल अभियंता, मध्य रेल्वे, मुंबई यांना पत्र क्र.पीबी/प्लॅनिंग/आयओबी-आरयुबी/३५७/२०१०, दि.१९/०१/२०१० अन्वये प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गावर प्रचंड वाहतूक असून रेल्वे क्रॉसिंगवर अनेक अपघात घडले असल्यामुळे सदर रेल्वे ओव्हर ब्रीजचे बांधकाम त्वरीत पूर्ण होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) नाही.

अधिक्षक अभियंता, सा,बां. मंडळ, कोल्हापूर यांनी मुख्य पूल अभियंता, मध्य रेल्वे, मुंबई यांना पत्र क्र. पीबी/प्लॅनिंग/आयओबी आरयुबी/३५७/२०१०, दि. १९/०१/२०१० अन्वये प्रस्ताव सादर केला आहे.

(२) प्रश्नांकित रेल्वे क्रॉसिंगवर अपघात झालेले नसल्याचे पोलीस विभागाने प्रमाणित केले आहे. प्रस्तुत पुलाची कामे मंजुरी निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार व रेल्वेच्या मंजूरीनंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.

निफाड तालुक्यातील नांदुर मधमेश्वर अभयारण्याकडे जाणा-या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२४) २८६५७ (२३-१२-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात पर्यटनास चालना मिळावी म्हणुन २००६ साली पर्यटन धोरण तयार करुन सार्वजनिक बांधकाम व इतर पायाभुत सुविधा देणा-या यंत्रणांच्या वार्षिक बजेटच्या ५ टक्के निधी पर्यटनासाठी पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी खर्च करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी मा. व्यवस्थापकीय संचालक, एम. टी.डी.सी. यांनी लेखी पत्रान्वये पर्यटन धोरणाचा संदर्भ देऊन निफाड तालुक्यातील पर्यटन स्थळ असणा-या नांदुर मधमेश्वर अभयारण्याकडे जाणा-या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती मा. सचिव (रस्ते) व मा. जिल्हाधिकारी ,नाशिक यांच्याकडे त्या सुमारास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापकीय संचालक, एम.टी.डी.सी. यांचे दि.७.१०.२०१५ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(३) व (४) विषयांकित रस्त्यांचे कामाच्या अनुषंगाने सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. सदर काम मंजूरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

अचलपूर मतदार संघातील रस्ते व पुलांच्या कामांना मंजुरी देण्याबाबत

(२५) २८८९२ (२३-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदार संघातील रस्ते व पुलांच्या कामांना तातडीने मंजुरी न दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक विधानसभा सदस्य अचलपूर यांनी दिनांक १६ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अमरावती जिल्हयतील अचलपूर मतदारसंघातील खालील नमूद कामे मंजूर आहेत.
(i) चांदूरबाजार-परतवाडा रस्त्याच्या कि.मी. १७५/०० ते १७७/०० मध्ये सुधारणा करणे,
(ii) राजूरा ते बेलोरा रस्त्याच्या कि.मी. ११/०० ते १६/०० मध्ये सुधारणा करणे,
(iii) राजूरा ते बेलोरा रस्त्याच्या कि.मी. २७/०० ते २८/०० मध्ये सुधारणा करणे,
(iv) चिंचोली-बेलोरा रस्ता प्रजिमा २८ कि.मी. ४/५०० ते ७/०० या रस्त्याची सुधारणा करणे,

उर्वरीत रस्ते व पुलांची कामे मंजूरी, निकष व निधीच्या उपलब्धतते अधिन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

रुंझा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

(२६) २९४१९ (२३-१२-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुंझा (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील ब्रिटीशकालीन पुलांची दुर्दशा झाली असुन वारंवार होणाऱ्या अपघाताची घटना टाळण्यासाठी या पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.
पुलाचा पृष्ठभाग खराब झाला होता. सद्य:स्थितीत पुलाचा पृष्ठभाग दुरुस्त करण्यात आला असून पुल वाहतूकीस योग्य आहे.
(२) सदर पुलावरुन अपघात होऊ नयेत याकरिता संरक्षण भिंत बांधण्याचे काम निधी व निकषाच्या अधिन राहुन हाती घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली-कोल्हापूर मार्गावरील चौपदरीकरणाचे काम अपुर्ण असल्याबाबत

(२७) २९४८८ (२२-१२-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढत्या अपघाताची मालिका कमी करण्यासाठी रस्ते विकास प्रकल्पांतर्गत सद्या सुरु असलेल्या सांगली-कोल्हापूर मार्गावरील चौपदरीकरणाचे काम ७५ टक्के पुर्ण झाले असून राहिलेल्या २५ टक्कयांमध्ये प्रामुख्याने उड्डाणपुलांची कामे रेंगाळलेली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम अत्यंत मंदगतीने सुरु असल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(३) तसेच हा ठेका रद्द करुन या रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्गातून व सहापदरी करण्याचे प्रस्तावित आहे हेही खरे आहे काय ,

(४) असल्यास, सदर कामे रेंगाळण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) भूसंपादन तसेच स्थानिक नागरिकांच्या कामांच्या वाव बदलाच्या मागणीनुसार कामाची गती मंद राहीली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील (ता.कर्जत) राज्यमार्ग रस्त्यावरील चांदई येथील उल्हास नदीवरील पुलावरून जाणे धोकादायक झाले असल्याबाबत

(२८) २९७०० (२२-१२-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील (ता.कर्जत) राज्यमार्ग रस्त्यावरील चांदई येथील उल्हास नदीवरील पुलावरून जाणे धोकादायक झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाची दुरुस्ती वेळीच न केल्यास अपघाताची भिती निर्माण झाली आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर पुलाच्या वेअरींग कोटवर पडलेले खड्डे डांबराने भरुन पूल वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. पूलावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कराड (जि.सातारा) तालुक्यात ढेबेवाडी रस्ता चौपदरीकरणाबाबत

(२९) ३०५२७ (२२-१२-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) तालुक्यात ढेबेवाडी रस्ता चौपदरीकरणाचे काम मोठ्या गतीने सुरू आहे. फणसेमळा परिसरात काम सूरू असून बांधकाम हद्दीत विहिर आल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे, पाच पिढयाची विहिर असून ती बुजल्यास संबंधित शेतकऱ्याची मोठी हानी होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही विहिर बुजविल्यास संबंधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
प्रश्नांकित रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम हे अस्तित्वातील शासकीय मालकीच्या जमीनीवर २४.४० मीटर रुंदीमध्ये करण्यात येत असून कणसेमळा येथील सदर विहीरीचा सुमारे २/३ भाग हा उपरोक्त २४.४० मीटर रुंदीमध्ये येतो.
(२) तथापि, सदर विहीरीचा पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने संबंधित शेतकऱ्यांच्या सहमतीने रस्त्याच्या हद्दीबाहेरील भागामध्ये १२०० मी. मी व्यासाचा सच्छीद्र पाईप बसविण्याचे नियोजन आहे. सबब, याप्रकरणी नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरील माजगांव येथील रस्त्यावरील उरमोडी नदीवर उंच पुल बांधण्याबाबत

(३०) ३०५४० (२२-१२-२०१५). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ वरील माजगांव येथील

रस्त्यावरील उरमोडी नदीवर उंच पुल बांधण्यासाठी नाबार्ड २१ मध्ये समावेश करुन निधी उपलब्ध करण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विषयांकित पुलाचे काम निकष, मंजूरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

रत्नागिरी जिल्हयातील (ता.खेड) कशेडी घाटात भूयारी मार्ग काढण्याच्या प्रलंबित कामाबाबत

(३१) ३०७११ (२२-१२-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील (ता.खेड) कशेडी घाटात बोगदा काढण्याची चर्चा सुरु असली तरी प्रत्यक्षात मात्र याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या प्रक्रियेत ज्या गावांतून हा रस्ता तयार करण्यात येणार आहे त्या गावांतील मोजणी पूर्ण झाल्याचे भासविण्यात येत असले तरी कशेडी गावातील मोजणी मात्र अद्याप पुर्ण झालेली नसल्याने उक्त महामार्ग चौपदरीकरण होण्याकरीता अडसर ठरत आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१) नाही.
इंद्रापूर (कि.मी. ८४/००) ते झाराप (४५०/१७०) भागाच्या चौपदरीकरणाकरीता केंद्र शासनाने दिनांक २१.०६.२०१३ रोजी पत्रान्वये तत्वत: मंजूरी दिली आहे. त्यात कशेडी (कि.मी. १५४/३००) येथे १.७२ कि.मी. लांबीचा बोगदा प्रस्तावित आहे. सदर चौपदरीकरणाच्या सुसाध्यता अहवालाच्या आधारे भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. भूसंपादन झाल्यानंतरच निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

(२) व (३) कशेडी घाटामधील बोगदयाची पोचमार्गासह एकूण लांबी ९.०० कि.मी. असुन चौपरीकरणाकरीता भूसंपादनाची ३(a) ची अधिसूचना केंद्र शासनाने दि.७.१.२०१४ रोजी प्रसिध्द केली आहे. त्यानुसार माणगाव व महाड तालुक्याची ३(a) ची अधिसूचना दि.२६.११.२०१५ रोजी प्रसिध्द झाली असून ती प्रसिध्द झाली असून ती प्रसिध्द करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. पोलादपूर तालुक्यातील गावांची संयुक्त मोजणी प्रगतीत आहे. कशेडी बोगदयामधील ११ गावांचे भूसंपादन होणार आहे. त्यापैकी रायगड जिल्हयातील ९ गावांची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून, रत्नागिरी जिल्हयामधील २ गावांची संयुक्त मोजणी प्रगतीपथावर आहे.

लातुर जिल्हयातील जळकोट येथे शासकीय विश्रामगृह मंजूर करणेबाबत

(३२) ३०७९८ (२२-१२-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर जिल्हयातील जळकोट हा नवीन तालुका होवून १५ वर्षे झाली त्यामुळे याठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह मंजूर करावे यासाठी लोकप्रतिनिधीनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विश्रामगृह मंजूरीसाठी शासन काय उपाययोजना करणार आहे,

(३) असल्यास, विश्रामगृह मंजूरीसाठी लागणारा कार्यकाळ शासनाने स्पष्ट करावा,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यात नवीन विश्रामगृहे बांधण्यात येऊ नयेत असा निर्णय दि. १८.०१.२००२ च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रश्नाधीन ठिकाणी विश्रामगृहाचे बांधकामास मंजूरी देणे शक्य होऊ शकत नाही.

नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील नेरळ रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(३३) ३१२३९ (२२-१२-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ ता.कर्जत जि.रायगड येथील नेरळ रेल्वे स्थानकाला लागून असलेल्या पुलाचे नव्याने सहा महिन्यांपूर्वीच सार्वजनिक बांधकाम खात्याकडून बांधकाम करण्यात आले असून सहा महिन्यातच पुलाच्या लोखंडी सळ्या बाहेर आल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लोखंडी सळ्यांमुळे वाहनांचे टायर वारंवार पंक्चर होत असल्याने वाहनाचालकांना आर्थिक हानी होत आहे तसेच काही प्रसंगी अपघात सदृश्य स्थिती निर्माण होत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय.
(२) सदर पुलाच्या वेअरिंग कोर्सवर पडलेले खड्डे तात्काळ सिमेंट काँक्रीटने भरण्यात आलेले असून पुल वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) सावरोली ते इसाबाफाटा या रस्त्याची दुरावस्था झाल्याबाबत

(३४) ३३५३५ (२२-१२-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) सावरोली ते इसाबाफाटा हा रस्ता मे, २०१५ मध्ये नुतनीकरण करुनही माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पडलेल्या पावसात रस्त्याची दुरावस्था होवून मोठे खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात मोठमोठे कारखाने असल्यामुळे अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे तेथील विद्यार्थी, रुगणांना शाळेत व दवाखान्यात या रस्त्यावरुन ये-जा करताना त्रास सहन करावा लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग १ मधील रस्ता नुतनीकरण होवून दोन महिन्यात खराब होण्याची कारणे काय आहेत तसेच रस्त्याची दुरावस्था होण्यासाठी कारणीभूत असणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :(१) होय.
(२) सावरोली ते इसांबाफाटा या रस्त्यावर जुलै, २०१५ च्या अतिवृष्टीमुळे खड्डे पडले होते. तथापि सदरचे खड्डे खडी व ग्रीटने भरण्यात येऊन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

(३), (४) व (५) सदर रस्त्यावर जिओसेलने मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सावरोली ते इंसाबेफाटा या भागात प्रायोगिक तत्वावर हाती घेण्यात आले होते. परंतु सदरचा प्रयोग यशस्वी न झाल्यामुळे सदरचे लांबीत रस्ता क्षतिग्रस्त झाला होता. दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकणभवन व विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, व्हीजेटीआय, मुंबई यांच्यामार्फत सदर काम खराब झाल्याबद्दल कारणामांसा व त्यावरील उपाययोजना सुचविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर निष्कर्ष व शिफारशी प्राप्त झाल्यावर त्यानुसार योग्य कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

रायगड जिल्ह्यातील नेरळ-माथेरान घाट रस्त्यावरील नांगरखिंडी जवळील वळणावर रस्ता खचल्याबाबत

(३५) ३३५३७ (२२-१२-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील नेरळ-माथेरान घाट रस्त्यावरील नांगरखिंडी जवळील वळणावर माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास रस्ता खचला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा घाट रस्ता खचल्याने अशा गंभीर परिस्थितीमुळे या रस्त्यावरुन प्रवास करताना मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची दुरुस्ती केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय.

(२) व (३) जुलै, २०१४ च्या अतिवृष्टीमुळे माथेरान घाट रस्त्यावरील किमी. १/४०० व २/५०० या दोन ठिकाणी रस्ता दरीकडील बाजूस खचला होता. तातडीची उपाययोजना म्हणून सदर ठिकाणी संरक्षक भिंतीचे काम ऑक्टोबर, २०१४ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

कि.मी. २/७०० या ठिकाणी संरक्षक भिंतीचे काम प्रगतीत असुन मार्च, २०१६ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांना जोडणारा घोटगे-सोनवडे घाट मार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

(३६) ३४६२६ (२२-१२-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या घोटगे-सोनवडे घाट मार्ग करण्यात

यावा म्हणून त्या परिसरातील ग्रामस्थांनी मागील ३५ वर्षाहून अधिक कालावधीपासून सातत्याने लेखी निवेदनाद्वारे प्रत्यक्ष भेट घेवून आंदोलने करुन मागणी केली असतानाही त्याकडे शासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाल्याने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी पुन्हा सोनवडे घाट मार्गासाठी सोनवडे पंचकृषी कोल्हापूर येथील ग्रामस्थांनी कणकवली येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर धरणे धरण्याचा कार्यक्रम करुन शासनाला इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,घोटगे-सोनवडे घाट मार्गाच्या उभारणीच्या कामास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) सदरहू घोटगे-सोनवडे घाट मार्गाचे काम विनाविलंब हाती घेवून ते लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) सिंधुदुर्ग व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या घोटगे सोनवडे घाट मार्ग करण्याबाबत शासनाचे जाणवीपूर्व दुर्लक्ष झाल्याची बाब खरी नाही. तथापि, दिनांक १५/१०/२०१५ रोजी कणकवली ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर धरणे धरण्याचा कार्यक्रम केला, हे खरे आहे.

(२) सदर घाट रस्त्यामध्ये वनजमीन, खाजगी जमीन तसेच वनसंज्ञेखालील जमिन व राधानगरी अभयारण्याचा परिसर येत असल्याने सदरहू कामासाठी आवश्यक पूर्व परवानग्या प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. यास्तव या कामास विलंब लागत आहे.

(३) सदर घाट रस्त्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५ कि.मी. लांबीच्या बांधकामाकरिता रु. ५०० लक्ष रकमेचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे व यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु. १६१.६२ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे. घाट रस्त्याची आखणी वन जमिनीतून जात असल्याने वनविभागाची परवानगी मिळण्यासाठीचा प्रस्ताव वन विभागास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रस्तावास आवश्यक ते भूसंपादन करण्यासाठी वेळ लागत असल्याने कामास विलंब लागत आहे.

अंजनसिंगी (ता.जि.अमरावती) येथील बिल्दोरी नाल्यावरील पूलाच्या बांधकामाबाबत

(३७) ३४९०८ (२२-१२-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनसिंगी (ता.जि.अमरावती) येथील बिल्दोरी नाल्यावरील पूलावरुन कायम पाणी वाहत असल्याने तो जिवघेणा झाला असल्याने याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत अनेक विनंत्या संबंधितांकडे करुनही शासनाने याबाबत आवश्यक कार्यवाही केली नसल्याने निरपराध

नागरिकांना आपले जीव गमवावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित नदीच्या पुलावर बांधकाम करण्यासाठी उर्ध्व वर्धा प्रकल्पाने आवश्यक निधी मंजूर करुन सार्वजनिक बांधकाम खात्याला वर्ग करणे गरजेचे असतानाही तो करण्यात येत नाही तरी याबाबत शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) अधिक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर यांनी रुपये ६०० लक्षचा ठेवनिधी दि. १९/८/२०१५ रोजी सा.बां. विभागाकडे जमा केला. तद्नंतर दि. ५/११/२०१५ रोजी कामाची प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली आहे. सद्यस्थितीत पुलाचे २ स्तंभ व प्रस्तंभ चे काम प्रगतीपथावर असुन लवकरात लवकर पूलाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यामध्ये कळमगाव गन्ना रस्त्यावरील उमा नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणेबाबत

(३८) ३५१७१ (२३-१२-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्यामध्ये कळमगाव गन्ना रस्त्यावरील उमानदीवर ७ कोटी ५० लक्ष रुपये अंदाजपत्रक असलेल्या मोठ्या पुलाचे बांधकाम करणे तसेच नाबार्ड अंतर्गत सावली तालुक्यातील व्याहाड निफान्द्रा गागलवाडी आणि बोथली सिरसी व्याहाड या रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे तसेच ब्रम्हपुरी तालुक्यातील गागलवाडी बरडकिन्ही तसेच सिंदेवाही तालुक्यातील जामसाळा मोहाडी रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करण्यासाठी निधीसह मंजुरी मिळण्याबाबतचे निवेदन माहे मे २०१५, जुलै २०१५, ऑगस्ट २०१५, सप्टेंबर २०१५, दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास लोक प्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, अप्पर मुख्य सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासात्मक कामे करण्यासाठी निधीसह कामे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन पूलांची कामे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

कुडाळ व मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्याला जोडणाऱ्या महत्वाचा नेरुरपार पुलाच्या दुरुस्तीबाबत

(३९) ३५२३२ (२३-१२-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ व मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्याला जोडणारा महत्वाचा नेरुरपार पुलाचा स्लॅबचा भाग खचून जाऊन लोखंडी शिडा गंजलेल्या असल्यामुळे कोणत्याही क्षणी पुल कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता असल्याने सदरहू पुल तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थ व लोकप्रतिनिधिंनी माहे सप्टेंबर,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, त्याकरीता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :(१) नाही. सदर बाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही. सद्यःस्थितीत पूल सुस्थितीत असून पुलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली ते पेठ रस्ता रा.मा. १५२ या रस्त्याच्या ३१/४०० ते ३६/०० या भागाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४०) ३५३१० (२३-१२-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली ते पेठ रस्ता रा.मा. १५२ या रस्त्याच्या ३१/४०० ते ३६/०० या भागाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे काम पूर्ण होऊन एक वर्ष देखील झाले नसताना हा रस्ता वापरण्यास अयोग्य झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा रस्ता खराब झाल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, हा रस्ता बांधून पूर्ण झाल्यावर शासकीय गुण नियंत्रकामार्फत या रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासण्यात आला होता काय,

(५) असल्यास, त्याचा अहवाल काय होता तसेच या कामाची चौकशी होऊन दोषी असलेल्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१६) :(१), (२) व (३) हे खरे नाही.

काही लांबीमध्ये रस्त्यालगतच्या शेतक-यांनी गटार खोदण्यास मनाई केल्याने गटार खोदाई करण्यात आलेली नव्हती. विषयांकित लांबी पूर्णपणे काळ्या मातीच्या भुस्तरातून व बागायत क्षेत्रातून जात असल्याने ज्या लांबीमध्ये गटार खोदाई करणे शक्य झाले नाही. त्या लांबीत पाण्याच निचरा न झाल्याने व अवजड वाहतुकीमुळे डांबरीकरण खराब झाले. अद्याप स्विकृत निविदेप्रमाणे सदरचे काम दोष दायित्व कालावधीमध्ये असल्याने ठेकेदाराच्या खर्चाने दुरुस्त करुन घेण्यात आलेले आहे. सद्या रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत चालू आहे.

(४) होय.

(५) व (६) सदर कामाची दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेकडून तपासणी झालेली आहे. व याबाबतचा चौकशी अहवाल अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेमार्फत मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे यांचे कार्यालयास प्राप्त झाला आहे. त्यातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील गावे जोडणारा सर्व्हिस रोड अनेक ठिकाणी अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

(४१) ३५५०९ (२२-१२-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील गावे जोडणारा सर्व्हिस रोड अनेक ठिकाणी अपूर्ण असून ज्या ठिकाणी गाव आहे त्या भुयारी मार्गापर्यंतच आयआरबी कंपनीकडून रस्त्याची सुविधा तयार केली आहे परंतु पूर्ण सर्व्हिस रोड न केल्यामुळे त्या परिसरातील ग्रामस्थांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई - अहमदाबाद महामार्गाच्या सहापदरी करणाचे काम पूर्ण होत आले असताना चिल्हार फाटा ते दुर्वेस उड्डाणपुल तयार होऊन आयआरबी कंपनीच्या ठेकेदारांनी भुयारी मार्गाच्या क्षेत्रापर्यंतच्या सर्व्हिस रस्त्याचे काम केले आहे अशाच प्रकारे विरार, नालासोपारा, वसई, चारोटी, महालक्ष्मी, तलासरी इ. अनेक ठिकाणी रस्ता संलग्न न ठेवता त्या सर्व्हिस रोडचे विविध भाग करुन काम केले आहे त्यामुळे या परिसरात अनेक मोठे अपघात होऊन त्यामध्ये कित्येक लोकांचे प्राण जाऊन गंभीर जखमी झालेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करण्यात येऊन जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१) अंशत: खरे आहे, असे व्यवस्थापक (तांत्रिक), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पी.आय.यु. सुरत (एक्सप्रेसवे) यांनी कळविले आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे, परंतु विरार, नालासोपारा, वसई, चारोटी, महालक्ष्मी, तलासरी इ. भागात तयार करण्यात आलेल्या भुयारी मार्गाच्या क्षेत्रापर्यंतचे सर्व्हिस रस्त्यांचे काम पूर्ण झालेले आहे तसेच उर्वरित भागातील प्रस्तावित सर्व्हिस रस्त्यांचे काम सवलतकरामार्फत प्रगती पथावर आहे.

ढेकाळे ते तलासरी तसेच वसई विरार भागातील भूसंपादनातील समस्या सोडविण्याचे प्रयत्न करुन उर्वरीत सर्व्हिस रस्त्यांचे काम सुरु करण्यात आले असून लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सवलतकरारामार्फत करण्यात येत असल्याचे, व्यवस्थापक (तांत्रिक), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पी.आय.यु. सुरत (एक्सप्रसवे) यांनी कळविले आहे.

पुणे येथील शासकीय निवासस्थानाचे प्रलंबित भाडे भरण्याबाबत

(४२) ३५५६३ (२२-१२-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठा सेवा संघाचे संस्थापक-अध्यक्ष तथा सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता पुरुषोत्तम खेडेकर हे सेवानिवृत्त झाल्यावरही शासकीय निवास्थान क्रमांक ९-ब, राणीचा बाग, पुणे येथे अनेक वर्षे विनामोबादला रहात होते. त्या निवासस्थानाचे दिनांक १०.६.२००५ पासून वर्ष २०१२-२०१३ पर्यंतचे अंदाजे ४० ते ४५ लाख रुपयांचे भाडे त्यांनी भरलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) सदर निवासस्थानाचे भाडे आणि दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे
(३) निवासस्थानाचे प्रलंबित भाडे भरण्याविषयी पुरुषोत्तम खेडेकर यांना शासनाकडून वारंवार स्मरणपत्रे आणि सूचना देऊनही ते त्याकडे दुर्लक्षित करत आहेत, हे खरे आहे का,
(४) असल्यास, शासकीय रक्कम प्राप्त करण्यासाठी खेडेकर यांच्या संपत्तीवर जप्ती आणण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय,
(५) या विषयी शासनाचे नेमके धोरण काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) : (१) होय. अंशत: खरे आहे.

श्री.खेडेकर यांनी दि.३१.८.२००७ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.३०.११.२००७ पर्यन्त ९-ब, राणीचा बाग, पुणे हे शासकीय निवासस्थान रिक्त करणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी दि. १.१०.२०१२ रोजी निवासस्थान रिक्त केले आहे. दि.१.१२.२००७ ते दि. १.१०.२०१२ या अनधिकृत वास्तव्याकरिता त्यांना रु. ३८,३१,५०६/- एवढा दंडनीय दर आकारण्यात आला आहे.

(२), (३) व (४) या कार्यासनाच्या दि. २७.८.२०१५ च्या ज्ञापनान्वये श्री.खेडेकर यांच्याकडून वसूल करावयाची रक्कम त्यांना प्रदान होणाऱ्या सेवानिवृत्ती लाभातून वसूल करण्याबाबत व त्यानंतरही वसुली शिल्लक राहिल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार जमीन महसूली म्हणून वसूल करण्याबाबत कळविण्यात आल आहे. त्या अनुषंगाने वसुली करण्याकरिता क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) शासकीय निवासस्थान अनधिकृतरित्या वास्तव्य करीत असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना निवासस्थानाकरीता आकारलेले दंडनीय भाडे माफ करण्याबाबत नियमात तरतूद नाही. कर्मचारी सेवानिवृत्त झाला तरी त्याला देय असणाऱ्या सेवानिवृत्तीनंतरच्या लाभाच्या रक्कमेतून दंडनीय दराची वसुली करावी व त्यानंतरही वसुली शिलक असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार जमीन महसूलाची वसूली करण्यात येते. या तरतूदींनुसार श्री. खेडेकर यांच्याकडून दंडनीय दर वसूली करण्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

ताम्हाणी (ता.माणगाव, जि. रायगड) येथील विश्रामगृह सुरक्षित करण्याबाबत

(४३) ३५६८८ (२२-१२-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताम्हाणी (ता.माणगाव, जि.रायगड) घाटात निसर्गरम्य ठिकाणी घाट माथ्यात सन २००८ मध्ये शासकीय विश्रामगृहाची इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विश्रामगृहात अवैधधंदे चालू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शासकीय विश्रामगृह सुरक्षित करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.

शा.नि.क्र. १९९५/प्र.क्र.८३५३/नियोजन-३. दि.०३/०९/१९९५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार भांडारगृह तथा विश्रामगृहाची इमारत बांधण्यात आली आहे. मात्र तेथे वीज व पाणी यांची सोय नसल्याने त्याचे विश्रामगृह म्हणून वापर करण्यात आलेला नाही.

(२) याबाबत लेखी तक्रार/माहिती प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिन्नर (जि. नाशिक) येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकामास विशेष बाब म्हणून अनुदान उपलब्ध करून देणेबाबत

(४४) ३५७५४ (२२-१२-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि. नाशिक) येथील प्रशासकीय इमारतीचे काम माहे ऑक्टोबर, २०१३ पासून प्रगतीपथावर असून काम निधी अभावी बंद पडण्याची शक्यता आहे, शासकीय कार्यालयांना जागेअभावी काम करण्यास अडचण होत असून सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट होत असल्याने इमारतीचे बांधकामास गती मिळून काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी विशेष बाब म्हणून अनुदान देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ०९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) प्रश्नाधीन प्रकरणी निवेदन प्राप्त आहे, हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नाधीन इमारतीचे काम प्रगतीत असून पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे. विभागाकडे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध नियतव्ययाच्या तुलनेत चालू कामांचे दायित्व मोठ्या प्रमाणावर असल्याने सदर कामास पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकला नाही.

सदर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात निधीचा उपलब्धतेनुसार व प्राथम्यक्रमानुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

पाचोरा भडगाव (जि.जळगाव) येथे रेल्वे पूलाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(४५) ३६७०६ (२२-१२-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा भडगाव (जि.जळगाव) या विधानसभा मतदार संघातील रेल्वे ओव्हर ब्रिज (आरओबी) मंजूर होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि.१७ जून, २०१५ रोजीच्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री , महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय .

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाकडून रेल्वे ओव्हर ब्रिज मंजूर करण्यात आला आहे काय, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या ब्रिजकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय.

मा.श्री. अे.टी. पाटील लोकसभा सदस्य यांनी दि.८/६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र यांना निवेदन सादर केले आहे.

(२) ते (४) नगर देवळा रेल्वे उड्डाण पूलाचे काम पूर्ण झाले आहे. कजगाव गोंडगाव रस्त्यावरील रेल्वे उड्डाण पूलाचे कामे निधी निकष व प्राधान्यक्रम व मंजूरीनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. उर्वरीत नांद्रा माहेजी व पाचोरा परधाडे रस्त्यांवरील रेल्वे उड्डाण पूलांची कामे रेल्वेच्या प्राधान्यक्रम यादित नसल्याने नजीकच्या काळात हाती घेण्याचे नियोजन नाही.

सांगली, कोल्हापूर तसेच शिराळासह वारणा खोऱ्यात जाण्यासाठी पुणे-बंगळूर महामार्गावरील वाघवाडी येथे उड्डाणपुल बांधण्याबाबत

(४६) ३६८९९ (२३-१२-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, कोल्हापूर तसेच शिराळासह वारणा खोऱ्यात जाण्यासाठी पुणे-बंगळूर महामार्गावरील वाघवाडी येथील नाक्यावर दर दोन-तीन महिन्यात निदान एक तरी गंभीर अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी उड्डाणपुल होण्याच्या दृष्टिने सर्व पक्षीय लोक एकत्र येवून रास्तारोको, मोर्चा इत्यादी माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यात येवूनही शासनाकडून अद्यापही त्याची दखल घेण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील वाहतुकीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उड्डाणपुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०२-२०१६) :

(१) होय, हे खरे असून सदरील भागात सन २०१४ व २०१५ मध्ये एकूण २० अपघात झाल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महसंचालक (वा), मुंबई यांनी कळविले आहे.

(२), (३) दि. २८/०३/२०११ रोजी वाघवाडी जंक्शनवर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत उड्डाणपुलाच्या मागणीसाठी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते, असे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वा), मुंबई यांनी कळविले आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत प्रस्तावित असलेल्या सातारा ते कागल ह्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या सहापदरीकणाच्या कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (डी.पी.आर.) सदर ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याची बाब समाविष्ट असल्याचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे व अहमदनगर हे दोन्ही जिल्हे यांचे अंतर कमी करुन रस्त्याने जोडण्याबाबत

(४७) ३७०३४ (२२-१२-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व अहमदनगर हे दोन्ही जिल्हे आदिवासी अतिदुर्गम भागातील असून तेथील दोन तालुके व जिल्हे यांचे अंतर कमी करुन रस्त्याने जोडण्याबाबतची मागणी शहापूर व अकोले तालुक्यातील जनतेची गत दहा वर्षाची मागणी असल्याने डोळखांब-मेट-घाटघर रस्ता मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधी भिवंडी पूर्व यांनी मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री व आदिवासी मंत्री यांच्या माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शहापूर व अकोले तालुक्यात हा आदिवासी दुर्गम भाग रस्त्याने जोडल्यास ७० ते ८० कि.मी. चे अंतर कमी होऊन तेथील स्थानिक जनतेचा वेळ व पैसा वाचणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (१२-०२-२०१६) :(१) दि. ३.७.२०१५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील दौऱ्याचे वेळी लोकप्रतिनिधी यांनी विषयांकित कामाबाबत तोंडी सूचना दिल्या आहेत.

(२) होय.

(३) व (४) विषयांकित चौंढे खुर्द (मेट) ते घाटघर हा रस्ता संरक्षित वन जमिनीतून जात असून तो सन २००१-१२ रस्ते विकास योजनेमध्ये समाविष्ट नाही. सदर रस्ता योजनाबाह्य असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषात बसत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील (ता.यवतमाळ) दुर्गम बंदीभागातील वनविभागाच्या परिक्षेत्रामध्ये गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याबाबत

(४८) ३७८७२ (२२-१२-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील (ता.यवतमाळ) दुर्गम बंदीभागातील वनविभागाच्या परिक्षेत्रामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत खडीकरणाचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या बांधकामासाठी जवळपास ३ हजार ब्रास मुरुमाची व २ हजार ब्रास दगडाची आवश्यकता असून त्याची अंदाजित रक्कम ६ ते ७ लाखांपर्यंत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याकरिता पुसद येथील जय भोले कन्स्ट्रक्शन कंपनीच्या ठेकेदाराने महसूल विभागाकडून कोणताही परवाना न काढता रस्त्यालगत नालीतील मातीमिश्रीत मुरुम

मशिनने काढून बंदीभागातील विहिरींवरील व वन विभागाकडून दगड काढून रस्त्याचे काम केले असल्याचे दि. १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम करणाऱ्यासाठी परवानगी न घेता गौण खनिजाचे अवैध उत्खनन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर ठेकेदाराची चौकशी करण्यात आली आहे काय तसेच चौकशीनुसार गौण खनिजाचे अवैध उत्खनन करणाऱ्या व शासनाची फसवणूक करणाऱ्या ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठीची घरे इतरांना वाटप केल्याबाबत

(४९) ३८२८२ (२२-१२-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घरवाटप समितीचे पदसिध्द अध्यक्ष असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना अंधारात ठेवुन, शासकीय कर्मचाऱ्यांसाठीची घरे इतरांना वाटप केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम विभागाच्या या घरांमध्ये खरोखर शासकीय कर्मचारी राहतात की इतर व्यक्ती राहतात ही बाब सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा कळू दिली नाही, त्यामुळे शासकीय निवासस्थानांवर खाजगी लोकांनी ताबा घेतल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अभियंत्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

चिपळूण तालुक्यातील(जि.रत्नागिरी) चिवेली फाटा ते वाघिवरे रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करणेबाबत

(५०) ३८७२५ (२२-१२-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) चिवेली फाटा ते वाघिवरे रस्त्याची प्रचंड दुरावस्था झालेली असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याला साईडपट्ट्या नसल्याने व रस्त्यातील खड्डे यामुळे वारंवार अपघात होत असल्यामुळे या मार्गाचे डांबरीकरण व साईडपट्ट्या करणेबाबत स्थानिक नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०२-२०१६) : (१) होय, अंशत: खरे.

(२) होय.

(३) सदरहू रस्त्यावरील खड्डे जांभा खडीने भरण्यात आलेले असून डांबरीकरणाद्वारे रस्त्याची दुरुस्ती करण्याचे काम होती घेण्यात आले आहे. रस्त्यासाठी उर्वरीत आवश्यक दुरुस्तीची कामे मंजुरी निधी, निकष व प्राध्यान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.